# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **रात्री अपरात्री रस्त्यावर डेंब्रिज आणि रॅबिट टाकणाऱ्यावर चाप बसविण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत विशेष भरारी पथकाची नेमणूक**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मुंबईहून येणाऱ्या व मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अज्ञात वाहना मार्फत मोठ्या प्रमाणात डेब्रिज तसेच शहरातील नागरिकांनाकडून इमारत, प्लॉट आणि दुरुस्ती कामातून निघालेले रॅबिट तसेच टाकाऊ वस्तू मोकळ्या जागेत टाकून मिरा भाईंदर शहराचे सौंदर्य आणि पर्यावरण हे प्रदूषित करीत आहेत. अश्या घटना वारंवार घडत असल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा. प्र.से.) यांनी या गोष्टीला चाप बसावा यासाठी विशेष भरारी पथकांची नेमणूक केली आहे. या पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमार्फत रात्रीच्या वेळी गस्त घालून सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्यालगत कोणत्याही प्रकारची डेब्रिज, माती, चिखल तसेच रॅबिट टाकणारे वाहन दिसल्यास त्यांना थांबवले जाते. जे वाहन थांबत नाही त्या वाहनाचे डेब्रिज, माती, चिखल तसेच रॅबिट टाकतानाचे GPS फोटो काढण्यात आले असून झालेला प्रकार स्वच्छता अधिकाऱ्यांना लगेच कळवून पंचनामा करून ताबडतोब पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

आतापर्यंत मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या या विशेष भरारी पथकाने ऑगस्ट २०२४ या महिन्यात वाहन क्र. MH:-०४ KF ८१७६, वाहन क्र. MH:-०२ ER ५४५८ आणि वाहन क्र. MH ४३ CE १४६३ या तीन वाहनांवर व चालक / मालक यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. यापुढे मिरा भाईंदर शहरात कार्यरत असलेल्या विशेष भरारी पथकाच्या सतर्क कामगिरीमुळे रात्री अपरात्री रस्त्यावर किंवा मोकळ्या जागेत डेब्रिज, माती, चिखल तसेच रॅबिट टाकणाऱ्या वाहनांना आणि नागरिकांना कायमचा चाप बसणार असल्याचे मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी नमूद केले आहे.